फिरयाद

117

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** वेदांत नगर **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0063 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/04/2020 02:03 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 31/03/2020

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 31/03/2020

**Time From (वेळेपासून):** 17:32 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:32 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/04/2020 **Time (वेळ):** 01:52 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/04/2020 01:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 3 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** 16,जिल्हा सत्र न्यायालयाच्या पाठी,मनिषा कलणी,औरंगाबाद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** कादरी सय्यद ताबीशुद्दीन फसिद्दीन

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** कादरी सय्यद फसिद्दीन सिराजोद्द

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 01/11/1983 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

118



(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 4-11-43/70,सिराज मंजील, आजम कलनी,रोशनगेट, सादात मज्जीदसमोर,औरंगाबाद, जिन्सी,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 4-11-43/70,सिराज मंजील, आजम कलनी,रोशनगेट, सादात मज्जीदसमोर,औरंगाबाद, जिन्सी,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8888921910

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीराम बाबुराव बिन्हारे | | | 1. प्लटनं16,मनिषा कलणी,,जिल्हा सत्र न्यायालयाच्या पाठी,औरंगाबाद,वेदांत नगर,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत<br>2. उपअभियंता सार्वजनिक बांधकाम वि, विभागपश्चिम,औरंगाबाद,वेदांत नगर, औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि.01/04/2020 मी कादरी सय्यद ताबीशुद्दीन पिता फसिद्दीन, वय- 38 वर्ष, व्यवसाय - शासकीय कंत्राटदार, रा. घर नं.4-11-43/703, सिराज मंजील, आजम कलनी, रोशनगेट, सादात मज्जीदसमोर, औरंगाबाद. मो.नं. 8888921910मी दिनांक 30/3/2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, औरंगाबाद येथे हजर येऊन तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन मी शासकीय कंत्राटदारीचे काम करतो. माझी आयकन इंटरप्रायजेस या नावाची फर्म आहे. त्या बाबतचे लायसन्सची झेरक्स प्रत मी आपणाकडे हजर करीत आहे. आयकन इंटरप्रायजेस यांचे नावे औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह येथील मुख्य दरवाज्याचे उत्तर बाजुस वच टवरचे बांधकाम करणेसाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांच्याकडुन 72,92,579/- रुपयाचे काम मी 19.19 टक्के कमी दराने घेतलेले आहे. त्याबाबतची वर्कआर्डर मला दि. 28/5/2019 रोजी मिळालेली आहे. तसेच औरंगाबाद कारागृहातील महीला व पुरुषाचे मुलाखत रुमचे दुरुस्ती करणे बाबत मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांच्याकडुन दि. 28/02/2019 रोजी वर्कआर्डर मिळालेली आहे. औरंगाबाद मध्यवर्ती कारागृहातील महीला कारागृहाचे नविन बांधकामासाठी मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांच्याकडुन दि. 28/02/2019 रोजी वर्कआर्डर मिळालेली आहे. असे वरील तीन कामाच्या वर्क आर्डर आयकन इंटरप्राइझेस फर्म यांना मिळालेल्या आहेत. औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह येथील मुख्य दरवाज्याचे उत्तर बाजुस वच टवरचे बांधकाम करणे साठी वर्क आर्डर मिळाले बाबतच्या छायाकीत प्रती आपणाकडे हजर करीत आहे.मी औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह येथील मिळालेल्या वर्कआर्डर नुसार दोन काम पुर्ण केलेले आहे. वरील तीन्ही कामापैकी औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह मुख्यदरवाज्याचे उत्तर बाजुस वच टवरचे बांधकाम सत्तर टक्के पुर्ण झालेले आहे. तीस टक्के काम बाकी आहे. वरील कामाचे बील तयार करुन सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, पदमपुरा, औरंगाबाद येथे दाखल केलेले आहे.महीला कारागृहाचे काम व मुलाखत कक्षाचे दोन्ही कामाचे 7,50,000/-रुपये या आगोदर मला मिळालेले आहे. उर्वरीत 15,00,000/-रुपयाचे बील कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, पदमपुरा, औरंगाबाद यांच्याकडे मंजुरी साठी जमा करण्यात आलेले आहे. सदरचे दोन्ही कामे पुर्ण करुन तसे औरंगाबाद कारागृह येथील अधिक्षक,यांनी काम पुर्ण झाले बाबतचे पत्र दिलेले आहे. सदर पत्राची छायांकीत प्रत आपणाकडे हजर करीत आहे.औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह येथे मुख्य दरवाज्याचे उत्तर बाजुस वच टवरचे बांधकामाचे 15,00,000/- रुपये या आगोदर मिळालेले असुन झालेल्या 70 टक्के कामाचे 26,00,000

/-रुपये बील प्रलंबीत आहे.आयकन इंटरप्रायजेस चे नावे प्रलंबीत असलेल्या बीलासाठी मी दि. 28/03/2020 रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, पदमपुरा, औरंगाबाद येथे 1) श्री. कोहाळे, जेई 2) श्री. बि-हारे, डेप्युटी इंजीनिअर 3) श्री. कुलकर्णी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग यांना प्रत्यक्ष भेटलो. त्यावेळी माझी श्री. कोहाळे जेई, श्री. बि-हारे, डेप्युटी इंजीनिअर यांच्यासोबत मिटींग झाली. त्यावेळी ते दोघे मला म्हणाले की, तुम्हाला आम्हा दोघांना व श्री. कुलकर्णी साहेबांना 3,80,000/-रुपये दयावे लागतील नसता तुमचे बील मंजुर होणार नाही. त्यावेळी मी श्री. कोहाळे साहेब व बि-हारे साहेब यांना माझ्याकडे एवढे पैसे नाही. मी वरील कामासाठी सर्व पैसे खर्च केलेले आहे. त्यावेळी श्री. कोहाळे साहेब व बि-हारे साहेब म्हणाले की,तुम्ही जर आम्हाला 3,80,000/-रुपये नाही दिले तर तुमचे बील मंजुर करणार नाही.श्री. कोहाळे साहेब, बि-हारे साहेब व श्री. कुलकर्णी,कार्यकारी अभियंता यांना मी जर 3,80,000/-रुपये नाही दिले तर ते माझे प्रलंबीत बीलाची रक्कम देणार नाही. त्यामुळे मी श्री. कोहाळे साहेब व बि-हारे साहेब यांना नाईलाजाने हो म्हणुन निघुन आलो.श्री. कोहाळे साहेब, बि-हारे साहेब व श्री.कुलकर्णी यांचेशी माझी वैरदुष्मनी नाही किंवा देणे घेण्याचा अगर उसनवारीचा व्यवहार नाही. मी आज दिनांक 30/03/2020 रोजी श्री. कोहाळे साहेब, बि-हारे साहेब व श्री. कुलकर्णी साहेब यांना वर नमुद कामानिमित्त भेटण्यासाठी सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद येथे जाणार आहे. श्री. कोहाळे साहेब, बि-हारे साहेब व कुलकर्णी साहेब यांनी माझ्याकडे 3,80,000/- रुपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम स्वत: किंवा इतरामार्फत स्वीकारल्यानंतर त्यांना पकडुन त्यांचेवर कायदेशिर कारवाई करावी हि विनंती. अशी तक्रार नोंदवुन घेतली होती.त्यानंतर पो.नि. उन्मेश थिटे यांनी मी दिलेली तक्रार पंचाना वाचावयास दिली पंचानी ती तक्रार वाचल्यानंतर त्यावर सहया केल्या व पोलीस निरीक्षक श्री उन्मेश थिटे यांनी सदर तक्रारीवर समक्ष म्हणुन सही केली. त्यानंतर पो.नि. उन्मेश थिटे यांनी माझ्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी मी व पंच नामे सय्यद गुलाम असे मो.सा.ने ऍन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद येथुन मी सांगीतल्या प्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभाग, पदमपुरा औरंगाबाद कडे रवाना झालो. सार्वजनिक बांधकाम विभाग, पदमपुरा औरंगाबाद चे अलीकडे सुरक्षीत ठिकाणी पोहचल्यानंतर पो.नि. श्री. उन्मेश थिटे यांनी मला व पडताळणी पथकास आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. श्री. उन्मेश थिटे यांचे सुचने प्रमाणे पोना/बाम्हंदे यांनी मला डिजीटल व्हाईस रेकर्डर चालु करुन दिला.त्यानंतर मी व पंच श्री.सय्यद गुलाम असे लोकसेवक 1) श्री. कोहाळे, जेई 2) श्री. बीरारे,डेप्युटी इंजीनिअर 3) श्री. कुलकर्णी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग यांना प्रत्यक्ष भेटण्यासाठी पंचासह सार्वजनिक बांधकाम विभाग, पदमपुरा औरंगाबाद येथे गेलो असता तेथे वरील तीघेजण कार्यालयात हजर नव्हते. म्हणुन मी श्री. बिन्हारे यांनी मला यापुर्वी भेटण्यासाठी सांगीतले होते. त्यावरुन मी त्यांच्या घरी गेलो. त्यावेळी श्री.बिरारे साहेब यांची व माझी त्यांचे घरी भेट झाली त्यावेळी माझ्या प्रलंबीत बीलासंबधी चर्चा झाली. त्यामध्ये मी बिन्हारे साहेब यांना म्हणालो की, सर मै बहोत अंदर हो गयेवा है उसमे त्यावर श्री. बिन्हारे साहेब मला म्हणाले की, डिव्हायडेड बाय थ्री त्यावर मी त्यांना म्हणालो की,मतलब तिन लाख ऐंशी हजार त्यावर श्री. बीन्हारे साहेब मला म्हणाले की एक का करो बाकीका तुम बादमे करो असे म्हणाले त्यावर मी त्यांना म्हणालो की, एक लाख रुपये का त्यावर श्री. बिन्हारे साहेब मला म्हणाले की, बील निकलनेके बाद बस इसका एक का अभि करदो चलो . असे म्हणुन श्री. बिन्हारे साहेब यांनी माझ्याकडे 1,00,000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच असे आम्ही ऍन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद येथे परत आलो. त्यानंतर सापळा पथकातील एका सदस्याने माझ्याकडील व्हाईस रेकर्डर बंद केले. त्यानंतर माझे व लोकसेवक श्री.बिन्हारे,उपअभियंता यांचेमध्ये झालेले संभाषण पो.नि. उन्मेश थिटे यांनी पंचासमक्ष ऐकले त्यामध्ये श्री.बिन्हारे,उपअभियंता यांनी मला लगेच लाचेची रक्कम घेऊन येण्याचे सांगीतले होते परंतु माझ्याकडे एवढे पैसे नसलयाने मी त्यांना दि. 31/03/2020 रोजी भेटण्यासाठी जाणार असल्याचे पोलीस निरीक्षक उन्मेश थिटे यांना सांगीतले होते. त्यानंतर मी माझ्या नातेवाईकांकडुन व माझ्याकडील एक लाख रुपये जमा करुन मी आज दि.31/03/2020 रोजी एन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद येथे पोनि उन्मेश थिटे याना भेटलो त्यांवेळी त्यांनी मला व पंचाना सापळा कारवाई बाबत थोडक्यात माहीती दिली.ऍन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म मला व पंचाना समजावुन सांगुन त्यांचे प्रात्यक्षीक दाखवीण्यात आले. व मी जमा केलेले 1,00,000/-रुपये ज्यात पाचशे रुपये दारच्या 20 चलणी नोटा व 2000/-रुपये दराच्या 45 नोटांना ऍन्थ्रासीन पावडर लावुन श्री.बिन्हारे,उपअभियंता यांना देण्याकरीता मी परिधान केलेल्या पन्टचे समोरील उजव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर पोनि उन्मेश थिटे यांच्या सुचनेवरुन पोना/बाम्हंदे यांनी व्हाईस रेकर्डर चालु करुन माझ्याकडे दिला.त्यानंतर मी पंच श्री. सय्यद गुलाम यांचे सह मोटार सायकलने सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद येथे गेलो. आमचे पाठिमागुन सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने थांबले. मला सदर कार्यालयात कोणीच दिसले नाही. त्यामुळे मी श्री. बिन्हारे साहेबांना फोन केला तेव्हा त्यांनी मला माझ्या बीलांवर शिक्के मारुन आणण्याचे सं◌ागीतले त्यावरुन मी श्रीमती जगदाळे मडम यांना फोन केला असता त्यांनी मला घरी बोलावले त्यांनी मला माझ्या बीलांवर शिक्के मारुन दिले. त्यानंतर मी व पंच असे श्री. बिन्हारे साहेब यांनी सांगीतल्या प्रमाणे त्यांच्या घरी गेलो.त्यावेळी माझी व श्री. बिन्हारे,उपअभियंता यांच्या सोबत भेट झाली.त्यावेळी माझ्या कामासंबधाने चर्चा झाली. त्यावेळी श्री. बिन्हारे साहेब मला म्हणाले की, हुं, तो अभी कितना लाया तुमने असे बोलले त्यानंतर मी त्यांना आपने जो एक लाख रुपये बोले थे उतने लाया हु असे सांगितले त्यानंतर त्यांनी माझ्या फाईलवर व एमबी बुकवर सहया केल्या. त्यानंतर त्यांनी मला रख दो फिर असे म्हणुन माझ्याकडील लाचेची रक्कम त्यांचे समोरील लाकडी स्टुलवर ठेवण्याचे सांगीतले. त्यावरुन मी माझ्याकडील 1,00,000/-रुपये लाचेची रक्कम लाकडी स्टुलवर ठेवल्यानंतर मी सापळा पथकास श्री. बिन्हारे यांनी लाच स्वीकारल्याचा पुर्व नियोजीत इशारा केला.ती वेळ 17.32 वाजताची होती. त्यावर लागलीच पोलीस पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी श्री. बिन्हारे,उपअभियंता यांना ताब्यात घेतले. त्यानंतर श्री. बिन्हारे,उपअभिंयता यांचे समोरील लाकडी स्टुलवरील लाचेची रक्कम रुपये 1,00,000/-रुपये पंचासमक्ष सापळा पथकाने हस्तगत केली. त्यानंतर श्री. बिन्हारे,उपअभियंता यांना त्यांचा संपुर्ण नाव पत्ता विचारण्यात आला.त्यांनी त्यांचे पुर्ण नाव श्रीराम बाबुराव बिन्हारे,उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद असे सांगीतले करीता लोकसेवक श्री.बिन्हारे,उपअभियंता यांनी मला मध्यवर्ती कारागृहाचे कामाची प्रलंबीत बील काढण्यासाठी मला 1,00,000/-रुपये लाचेची मागणी स्वत:च्या फायदयाकरीता करुन स्वत: स्वीकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष हि फिर्याद दिली. ठाणे अमलदार/दाखल करणार स.फौ. साहेबराव सांडुजी वाघ मो.क्र. 9823904547, तपासिक अमलदार-- पो.नि. उन्मेश थिटे ला.प्र.वि. औरंगाबाद मो.क्र.9823566251

(120)



13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): RAMESHWAR RAMRAO RODGE(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नांव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14.**Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): RAMESHWAR RAMRAO RODGE

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI

पोलीस निरीक्षक

पो.स्टे.वेदांतनगर

औरंगाबाद (शहर)